सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- (विस) ०१ दिनांक :- २०/०७/२०२२

ठराव क्रमांक :- २५६

विषय क्रमांक :- ०१

महानगरपालिका क्षेत्रात भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव अंतर्गत "स्वराज्य महोत्सव" तसेच दि.१३ ऑगस्ट २०२२ ते दि.१५ ऑगस्ट २०२२ या कालावधीमध्ये "हर घर तिरंगा" उपक्रम राबविण्यासाठी महापालिका क्षेत्रात विविध कार्यक्रम/उपक्रमाचे आयोजन करणेच्या अनुषंगाने सभागृहामध्ये झाले चर्चेनुसार ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

भारतीय स्वातंत्र्याला ७५ वर्षे पूर्ण होत असलेच्या पार्श्वभूमीवर जनतेच्या मनात या स्वातंत्र्य लढ्याच्या स्मृती तेवत रहाव्यात तसेच देश भक्तीची ज्वाज्वल्य भावना कायम स्वरुपी जनमानसात रहावी या उद्देशाने या दैदिप्यमान इतिहासाचे अभिमानपुर्वक संस्मरण करणेसाठी स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव अंतर्गत केंद्र शासनाच्या सूचनेनुसार "स्वराज्य महोत्सव" तसेच "हर घर तिरंगा" हे उपक्रम राबविणेत येत आहेत. त्या अनुषंगाने महापालिकेच्या वतीने दि.१३/०८/२०२२ ते दि.१५/०८/२०२२ या कालावधीमध्ये घरोघरी तिरंगा ध्वज लावणेसाठी प्रशासनाने तिरंगा राष्ट्रध्वज खरेदी करुन, नागरिकांना मोफत उपलब्ध करुन दयावेत तसेच, राष्ट्रध्वजाबरोबर ध्वज संहितेबाबतची माहिती पत्रके नागरिकांना वाटप करावी असे ही सभा सूचित करीत आहे.

तसेच, महापालिकेच्या सर्व सन्मा.पदाधिकारी व सदस्य यांनी महापालिका क्षेत्रातील प्रत्येक घरावर तिरंगा राष्ट्रध्वज लावणेसाठी स्वयंसेवी संस्था,क्रिडामंडळे, स्वांस्कृतिक मंडळे यांना यांच्या मार्फत नागरिकांच्यामध्ये प्रबोधन करावे. तसेच ध्वजसंहितेचे पालन व्हावे व राष्ट्रध्वजाची सुरक्षा व्यवस्था करणेसाठी ध्वज रक्षक टिम तयार करावी. त्याच बरोबर महापालिकेने वाटप केलेले राष्ट्रध्वज हे मोहिम संपलेनंतर प्रशासनाने ताब्यात घ्यावेत अथवा संबंधीत नागरिक यांना सदरचे ध्वज आझादीच्या अमृत महोत्सवाची आठवण म्हणून आपल्या घरी फोटो फ्रेम करुन लावणेबाबत प्रबोधन करावे. नागरिकांना तिरंगा राष्ट्रध्वज वाटप करणेसाठी प्रशासनाने त्याबाबतचे व्यवस्थितपणे नियोजन करावे असे ही सभा आदेशित करीत आहे.

तसेच, स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवा निमित्त महापालिकेच्या वतीने "स्वराज्य महोत्सव" व "हर घर तिरंगा" या उपक्रमांतर्गत विविध कार्यक्रम व उपक्रमांचे आयोजन करणेत यावे. त्यामध्ये हर घर तिरंगा रॅली काढणे, स्वातंत्र सैनिकांचा सत्कार समारंभ, माजी सैनिकांचा सत्कार समारंभ, महापालिकेतील उत्कृष्ठ काम करणारे अधिकारी यांचा व ७५ सफाई कर्मचारी यांचा सत्कार, ७५ विधवा महिला तिरंगा राष्ट्रध्वज प्रदान करणे, महापालिका शालेय विद्यार्थ्यां मार्फत तिरंगाची प्रतिकृती साकारणे, तिरंगा मॅरेथॉन स्पर्धा,तिरंगा चषक स्केटींग स्पर्धा, तिरंगा चषक कुस्ती स्पर्धा, तिरंगा चषक कबड्डी स्पर्धा, तिरंगा चषक बोटस् स्पर्धा, एरोमॉडेलींग शो इ.स्पर्धा कार्यक्रमांचे आयोजन करणेत यावे. आझादी का अमृत महोत्सव अंतर्गत महापालिका क्षेत्रामध्ये क्रांती स्फुर्ती उद्यान विकसीत करावे व त्यामध्ये सांगली जिल्ह्यातील स्वातंत्र सैनिक व स्वातंत्र संग्राम मधील विविध घटनांची माहिती चित्रीत करणेत यावी. महापालिका क्षेत्रातील देश पातळीवर प्राविण्य मिळविलेल्या खेळाडूंचा सत्कार इ. कार्यक्रमांचे आयोजन करुन आझादी का अमृत महोत्सव अंतर्गत "स्वराज्य महोत्सव" व "हर घर तिरंगा" उपक्रम मोठ्या प्रमाणात साजरा करणेत यावा व त्याबाबतची सर्व तयारी व अनुषंगिक कार्यक्रमाचे सुयोग्य नियोजन प्रशासनाने करावे असे ही सभा आदेशित करीत आहे.

सूचक :- श्री.विनायक सिंहासने. ठराव सर्वानुमते मंजुर

D.P. Suryavanshi

महापौर,

अनुमोदक :- श्री.संजय मेंढे.

महापालिका सचिव

मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका